# पिक संरक्षण व सर्वेक्षण केंद्र,

Plant Protection and Surveillance Unit,

**किटकशास्त्र विभाग,**

Department of Entomology,

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ, अकोला-४४४ १०४**

Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola-444 104

---

## पिक संरक्षण सल्ला (नोव्हेंबर,२०१४)

१. कपाशीवर **तुडतुडे** या किडींनीं आ.नु.सं.पातळी गाठतांच (२ ते ३ तुडतुडे प्रति पान) नियंत्रणासाठी, ॲसीटामीप्रीड २० टक्के १ ग्रॅम किंवा ॲसीफेट ७५ टक्के ७.८ ग्रॅम १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी.

२. सर्वेक्षणाअंती कपाशीवर **पांढरी माशीने** आर्थिक नुकसानीची संकेत पातळी गाठतांच सरासरी ८-१० प्रौढ माशा किंवा २० पिल्ले प्रती पान आढळुन आल्यास नियंत्रणासाठी ॲझाडिरेक्टिन १५०० पीपीएम ५० मि.ली. किंवा ॲसीटामिप्रीड २० टक्के भुकटी २ ग्रॅम थायोमेथोक्झाम २५ टक्के भुकटी ४ ग्रॅम किंवा ट्रायझोफॉस ४० इ. सी २० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन १ टक्के + ट्रायझोफॉस ३५ टक्के २० मि.ली. १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

३. कपाशीवर लाल व लोकरी **कोळीचा** प्रादूर्भाव दिसुन येत आहे. ही किड आकाराने सुक्ष्म असुन कोळी पानातील रस शोषण करतात. लाल कोळींनी रस शोषण केलेली पाने लालसर तांबडी होतात तर लोकरी कोळीनी रस शोषलेल्या पानावर पांढुरके केसाळ चटटे पडतात. या किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास डायकोफॉल १८.५ टक्के ५४ मि.ली. किंवा स्पायरोमेसीफेन २२.९ टक्के १२ मि. ली. किंवा फोजेलॉन ३५ टक्के ३५ मि.ली. यापैकी कोणत्याही एका किटकनाशकांची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**४. अलीकडे झालेल्या संशोधनानुसार बीटी कपाशीसाठी खालील एकात्मिक किड व्यवस्थपण संचाची शिफारस करण्यात आली:**

- शेताची स्वच्छता मेहीम व मार्च/एप्रिल मधे जमिनीची खोल नांगरणी

- कपाशीच्या सोबत मका, चवळी, झेंडू, व एरंडी या मिश्र सापळा पिकाची  एक ओळ
- पिक उगवणी नंतर १०५ दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी
- पिक उगवणी नंतर ११५ दिवसांनी ट्रायकागॅमाटॉयडीया बॅक्ट्री या परोपजीवी किटकाची १.५ लक्ष अंडी याप्रमाणात प्रसारण
- पिक उगवणी नंतर १२५ दिवसांनी पांढ-या माशाच्या नियंत्रणासाठी हेक्टरी १०ते १२ पिवळया चिकट सापळयांचा वापर
- पिक उगवणी नंतर १४० दिवसांनी थायोडिकार्ब ७५ टक्के १ किलो ५०० लि. पाणी याप्रमाणात फवारणी
- बोंड अळया व किडग्रस्त भागाचा नायनाट
- किडींनी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी गाठतांच शिफारशीप्रमाणे रासायनिक किटकनाशकांचा  वापर

५. तुरीवरील शेंगा पोखरणा-या अळयांच्या (घाटेअळी, पिसारी पतंग व शेंगे माशी) नियंत्रणासाठी खालील कोणत्याही एका किटकनाशकाची १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. क्लोरॅंट्रॅनिलीप्रोल १८.५० टक्के @ ३ मिली,  इथीयॉन ५० टक्के प्रवाही २० मिली, फ्लूबेंडामाइड ३९.३५ टक्के @ २ मिली. घाटेअळीच्या नियंत्रणासाठी एचएनपीव्ही २.० टक्के एएस या विषाणुजन्य जैवीक किटकनाशकाची २५०-५०० मिली प्रती हेक्टरी फवारणी करावी. फवारणी केल्यावर ८ - १० दिवस शेंगा तोंडू नयेत.

६. हरभरा पिकावर घाटे अळीने आर्थिक नुकसान संकेत पातळी गाठल्यास ( सरासरी १ अळी प्रती मिटर ओळीत किंवा ५ टक्के घाटयाचे नुकसान ) शिफारशीत रासायनिक किटकनाशकांची १० लिटर पाण्यात मिसळून साध्या (नॅपसॅक) पंपाने फवारणी करावी. क्विनालफॉस २० टक्के प्रवाही २० मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट ५ टक्के ३ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के  प्रवाही १० मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोमेथ्रीन ५ टक्के  प्रवाही १० मिली किंवा क्लोरॅंट्रॅनिलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही २.५ मिली

७. हरभरा पिकावर जमिनीतील  रोपे कुरतणा-या अळयांचा प्रादुर्भाव रोपाअवस्थेत आढळून येतो. अळया जमिनीमध्ये राहुन बियाण्यांचा अंकुर खातात तसेच रोपाचा जमिनी लगत खोडाचा भाग कुरतडतात. अळया फुगलेले दाणे पोखरतात. त्यामुळे दाण्याची उगवण होत  नाही. ऑक्टोंबर महिण्यात जोराचा पाऊस आल्यास या किडीचा प्रादुर्भाव कमी होतो. नकुजलेल्या  शेणखताचा शेतात वापर केल्यास या भुंग्याचा प्रादुर्भाव वाढतो तरी या किडी.च्या नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही ३७.५० मिली या किटकनाशकांची १० लिटर पाण्यात घेऊन

पंपाचे नोझलची टिकली काढून रोपावर हे द्रावण टाकून द्रावण जमिनीत मुळापर्यंत जाइल असे करावे.

८. ज्वारीवर कणसातील जाळे करणारी अळी, केसाळअळी तसेच घाटे अळी चा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कार्बारील १० टक्के भूकटी २० किलो प्रती हेक्टरी धूरळणी करावी.

९. धानावरील तपकीरी तुडतुडयांचे नियंत्रणासाठी ट्रायझोफॉस ४०/२० टक्के १२.५ - २५ मि.ली. किंवा इथोफेनप्रॉक्स १० टक्के प्रवाही १५ मिली किंवा फ्लोनिकॅमिड ५० टक्के दानेदार ३ ग्रॅम किंवा ॲसीटामीप्रीड २० टक्के २ ग्रॅम किंवा बुप्रोफेजीन २५ टक्के प्रवाही १६ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी . धान रोपांची लावणी योग्य अंतरावर केल्यास तपकीरी तुडतुडयांचे वाढ रोखण्यास मदत होते.



१०. **हुमनी अळी** ही बहूभक्षी किड असून हिचा प्रादूर्भाव कपाशी, सोयाबीन, ज्वारी , उस, भूइमुंग, कांदा इ पिकावर होउ शकतो. सदयस्तितीत कपाशी, सोयाबीनची झाडाची पाने पिवळी पडून सुकतात. अशी झाडे आढळल्यास झाड उपडून मुळे कुरतडलेली आहेत का ती पाहावी तसेच उपडलेल्या झाडाखालील २ ते ३ इंच खोल मातीत हुमनी अळया आहेत का ते शोधाव्या, अळया दिसल्यास व लक्षणीय प्रादुर्भाव असल्यास नियंत्रणासाठी खालील किटकनाशकांचा वापर करावा.

**भूइमुंग -**

कार्बोफ्यूरॉन ३ टक्के दानेदार ३३.३० किलो किंवा फोरेट १० टक्के दानेदार २५ किलो प्रती हेक्टर खोडांजवळ जमिनीत ओलावा असतांना मातीत मिसळू दयावे,

**उस -**

१. फोरेट १० टक्के दानेदार २५ किलो प्रती हेक्टर खोडांजवळ जमिनीत ओलावा असतांना मातीत मिसळून दयावे

२. फिप्रोनील ४० टक्के + इमिडॅक्लोप्रिड ४० टक्के दानेदार ५ ग्रॅम १० लिटर पाण्यात घेऊन द्रावण खोडांजवळ टाकावे

३.**कांदा -**

क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५० मिली १० लिटर पाण्यात घेऊन द्रावण खोडांजवळ टाकावे

**संत्रा:**

**१. फळातील रस शोषक करणा-या पतंगाचे व्यवस्थापन :**

- प्रकाश सापळयांचा उपयोग करावा.
- विषारी आमीषांचा वापर करावा. त्यासाठी १० लिटर पाण्यात १००० ग्रॅम गुळ आणि लेबल क्लेम किटकनाशक मिसळून आमीषांचे द्रावण तयार करावे. साधारण २५० मि.लि. द्रावण मोठे तोंड असलेल्या डब्यात टाकुन ते झाडावर अधून मधून ठिक ठिकाणी दर १० झाडामागे १ याप्रमाणे टांगावेत. त्यासाठी रिकाम्या झालेल्या किटक नाशकांच्या डब्याचा वापर करता येईल.
- संत्रा बगीच्याच्या नजिकच्या परिसरातील या किडींच्या अळीचे पूरक खाद्य वनस्पती जसे गुळवेल, वासनवेल किंवा तत्सम तणे यांचा नायनाट करावा. खाली पडलेले फळे नियमित वेचून खडयात पुरुन टाकावीत.
- रात्री ७.०० वाजताचे दरम्यान ओलसर कचरा अधून मधून जाळून बागेत धूर करावा.परंतू यामुळे झाडांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

**२.** संत्रावरील पाने पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी अळीचा प्रादुर्भाव दिसताच कार्बोफ्यूरॉन ३ टक्के दानेदार ५० किलो किंवा फोरेट १० टक्के दानेदार २५ किलो प्रती हेक्टर खोडांजवळ जमिनीत ओलावा असतांना मिसळून दयावे किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १.५ ते २.० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी

**३.** संत्रा पिकावर सायट्रस सिला या किडींचा लक्षणीय प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम २५ टक्के भुकटी १ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के १.५ ते २.० मिली किंवा मिथिल डिमॅटॉन २५ टक्के प्रवाही १० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १० दिवसाच्या अंतराने करावी.

**४.** संत्रा पिकावर काळी माशीचा (कोळशी) लक्षणीय प्रादुर्भाव असेल तरच नियंत्रणासाठी पिल्लावस्थेत मिथिल डिमॅटॉन २५ टक्के प्रवाही १० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १० दिवसाच्या अंतराने करावी.

**५.** संत्रा पिकावर माव्याचा लक्षणीय प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोऐट ३० टक्के प्रवाही १० मि.लि. किंवा मोनोक्रोटॉफॉस ३६ टक्के ३० मिली मिथिल डिमॅटॉन २५

टक्के प्रवाही ८ मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १० दिवसाच्या अंतराने करावी.

**६.** संत्रा पिकावर कोळीचा लक्षणीय प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी डायकोफॉल १८.५ टक्के २७ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १० -१५ दिवसाच्या अंतराने करावी

**७.** संत्रा पिकावर पाने खाणा-या अळीच्या लक्षणीय प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के ३० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १० दिवसाच्या अंतराने करावी

**टिप:**१. वर फवारणीसाठी दिलेले किटकनाशकांचे प्रमाण साध्या पंपासाठी असून पावर पंपासाठी हे प्रमाण तीनपट करावे

२.फवारणी केलेल्या क्षेत्रावर ८ ते १० दिवस जनावरे चारू नये.

शेतकरी बंधुनी उपरोक्त उपाययोजना केल्यास आपल्या येणा-या खरीप हंगामातील पिकांवर किडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास बरीच मदत होईल. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष संपर्क करावा. वरिल किडींबाबत सचित्र माहिती विदयापिठाचे संकेतस्थळ *pdkv.ac.in/Pest Situation During 2013-14 in Major Crops in Vidarbha Region* वर उपलब्ध आहे.

मुख्य पिक संरक्षण अधिकारी
पिक संरक्षण व सर्वेक्षण केंद्र
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

विभाग प्रमुख
किटकशास्त्र विभाग,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला